# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.11.2024** **वार – रविवार**

---

**पुणे प्रचार**

राज्य विधानसभा निवडणुकीसाठीच्या प्रचाराला आता अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत; त्यामुळे सर्वच पक्षांचे उमेदवार मतदारांच्या प्रत्यक्ष गाठी भेट घेत त्यांना मतदानाचं आवाहन करताना दिसत आहेत. त्याचबरोबर प्रचार फेरी, दुचाकी फेरी, कोपरा बैठकांच्या माध्यमातूनही मतदारांचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न विविध पक्ष करत आहेत.

**ऑनलाईन गुन्हेगारी**

सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पर्वती विधानसभा मतदारसंघात सायबर पोलिस ठाणं उभारणार असल्याची माहिती पर्वती विधानसभा मतदारसंघातल्या भाजपच्या उमेदवार माधुरी मिसाळ यांनी दिली. सॅलिसबरी पार्क परिसरात प्रचारफेरीत त्यांनी मतदारांशी संवाद साधला त्यावेळी त्या बोलत होत्या.

**सचिन पायलट-पुणे**

महाराष्ट्र नेहमीच देशाला दिशा दाखवत आला आहे; या विधानसभा निवडणुकीतही परिवर्तन घडवत महाराष्ट्र, देशाला योग्य दिशा दाखवेल, असा विश्वास कॉंग्रेस नेते आणि राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री सचिन पायलट यांनी पुण्यात व्यक्त केला. धार्मिक मुद्द्यावरून लोकांमध्ये फूट पाडणाऱ्या महायुती सरकारला लोक कंटाळले असल्याची टीकाही पायलट यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केली.

**कसबा-भोकरे**

पुण्यातल्या कसबा मतदारसंघात मुलांना खेळाची मैदानं उपलब्ध करून देण्यासह जुन्या तालमीचं नूतनीकरण करण्यासाठी उत्तम प्रशिक्षक नेमण्यावर भर देणार असल्याचं मनसेचे कसबा मतदारसंघातले उमेदवार गणेश भोकरे यांनी म्हटलं आहे. प्रचाराचा भाग म्हणून त्यांनी आज मतदारांशी संवाद साधला.

**वंचित प्रकाश**

वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना आमदारकी मिळाल्याशिवाय आरक्षणाच्या मुद्द्यावर आवाज बुलंद करता येणार नाही त्यामुळेच वंचितच्या उमेदवाराला मतदान करा असं आवाहन वंचित आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलं. पुणे शहर, जिल्ह्यातल्या विविध मतदारसंघातल्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत आंबेडकर यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधला.

**मनिष आनंद**

छत्रपती शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातले अपक्ष उमेदवार मनिष आनंद यांना महाराष्ट्र स्वराज्य पक्षानं पाठिंबा देत अधिकृत पुरस्कृत उमेदवार म्हणून जाहिर केलं आहे. पक्षाचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे यांच्या उपस्थितीत पुण्यात झालेल्या जाहीर सभेत यांनी ही घोषणा केली. दरम्यान विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर संपूर्ण पुणे जिल्ह्यातल्या मोठ्या आर्थिक व्यवहारांवर करडी नजर ठेवण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनानं दिले आहेत.

**<u>कार बाईकरॅ ली</u>**

पिंपरी चिंचवड शहरात मतदारांमध्ये मतदानाविषयी जागृतीसाठी महापालिकेनं विंटेज कार आणि बाईक रॅली, प्रदर्शनाचं आयोजन केलं होतं. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तसंच ज्येष्ठ कलाकारांनी पथनाट्य सादर केली. तसंच उपस्थित नागरिकांनी मतदानाची शपथ घेतली.

**<u>डेक्कन लिटरेचर</u>**

अभिनय शिकून येत नाही तर आयुष्यातले अनुभव, मिळणारी शिकवण यातून अभिनेता घडतो असं प्रतिपादन सुप्रसिद्ध अभिनेते, लेखक, कवी पंकज झा यांनी केलं. पुण्यातल्या दकनी अदब फाउंडेशन आयोजित पाचव्या डेक्कन लिटरेचर फेस्टिवलच्या पहिल्या दिवशी त्यांच्याशी संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी झा बोलत होते.

**<u>कीटक सन्मान</u>**

जैवविविधतेत असलेल्या 70 टक्के कीटकांमुळे मानवी जीवन समृद्ध झालं आहे. स्वार्थापोटी किटकांचा नाश न करता त्याचं संवर्धन करण्याची आवश्यकता असल्याचं मत प्रसिद्ध कीटक विज्ञान संशोधक आणि मित्रकिडा फौंडेशनचे संस्थापक-संचालक डॉ. राहुल मराठे यांनी व्यक्त केलं. करम प्रतिष्ठानतर्फे आज मराठे यांचा विशेष सन्मान करण्यात आला, त्यावेळी झालेल्या प्रकट मुलाखतीत ते बोलत होते.

**<u>एसटी बस</u>**

राज्य परिवहन महामंडळ म्हणजेच एसटीच्या पुणे विभागात वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता, येत्या काही दिवसात 160 नव्या बस पुणे एसटीच्या ताफ्यात दाखल होतील अशी माहिती परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी दिली. नादुरूस्त बस, कमी प्रवासी प्रतिसाद या कारणामुळे सध्या एसटीच्या 10 ते 12 टक्के फेऱ्या रद्द होतात. एसटीच्या बसमध्ये वाढ झाल्यास त्याच फायदा प्रवाशांना निश्चितच होईल असंही नेहूल यांनी सांगितलं.

**<u>सायबर फसवणूक</u>**

शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीतून चांगला परतावा देण्याच्या बहाण्याने सायबर चोरट्यांनी पुण्यातील एकाची 52 लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे; या प्रकरणी पीडीत व्यक्तीनं कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

**<u>भाजी बाजार</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत आज राज्य तसंच शेजारी राज्यातून फळभाज्यांची भरपूर आवक झाली. आवक आणि मागणी स्थिर असल्यानं फळभाज्याचे भाव टिकून आहेत. कोथिंबीरीच्या भावात घसरण झाली असून इतर पालेभाज्यांचे भाव स्थिर आहेत. लग्नसराईमुळे फूल बाजारात उत्साहाचं वातावरण असून शोभिवंत फुलांची मागणी वाढली आहे.

**<u>हवामान</u>**

गेले दोन दिवस आलेलं मळभ सरून, पुण्यात पुन्हा एकदा थंडीची चाहूल लागली आहे. आज दिवसभर आकाश निरभ्र राहिलं. कमाल तापमान 31 तर किमान 18 पूर्णांक 3 अंश नोंदवलं गेलं. उद्याही हवामानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**